स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्य सामाजिकशास्त्रे
विद्याशाखेतील राज्यशास्त्र विषयात पीएच.डी. पदवीसाठी

सादर करण्यात येणारा

प्रारूप संशोधन आराखडा

शोध प्रबंध

''हिंदी महासागरातील सत्तास्पर्धेत भारताच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास''

संशोधक

नामदेव विठ्ठलराव खंदारे

मार्गदर्शक

डॉ.आर.आर. बैनवाड

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
नूतन महाविद्यालय, सेलू

मार्च - २०१६.

''हिंदी महासागरातील सत्तास्पर्धेत भारताच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास''

प्रस्तावना :

आंतरराष्ट्रीय राजकरणात हिंदी महासागराची महत्त्वाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या काळात हिंदी महासागार या क्षेत्राची ओळख ब्रिटनची झील अशी होती. सुएझ कालवा, दक्षिण आफ्रिकेचा केप ऑफ गुड होप, सिंगापूर आणि मलेशियात त्यांचे नाविक तळ होते. १९५० च्या दशकात ब्रिटीश सत्तेने येथून काढता पाय घेतला तेव्हा तेथे शून्य शक्ती काळ निर्माण झाला होता. अमेरिकेच्या प्रवेशाने मात्र सत्ता संघषांची सुरूवात झाली. 'दिएगो गर्सिया' ब्रिटिशांचे बेट अमेरिकेकडे गेले. येथे आज अमेरिकेचा नाविक तळ आहे. १९७० च्या दशकात या क्षेत्रात अमेरिका आणि रशिया याबरोबरच इटली, जपान, फ्रान्स, ब्रिटन, चीन इत्यादी राष्ट्रांची सत्ता स्पर्धा दिसून येते.

हिंद महासागर जगातील सर्वात मोठा महासागार आहे. जवळ-जवळ २० टक्के भूभाग या सागराने व्यापला आहे. अंदाजे क्षेत्रफळ २९२१३१००० घन कि.मी. आहे. हिंदी महासागर १०४०० कि.मी. लांब आणि ९६००० कि.मी. रूंद आहे. पूर्व पश्चिम दिशेला ऑस्ट्रेलिया व आफ्रिकापर्यंत आणि उत्तर दक्षिण दिशेला केप कोमोदिन अटलांटीक बेटापर्यंत पसरला आहे. हिंदी महासागरातील सर्वात मोठे बेट मादागास्कर असून इतर रियुनियन, कोमोरोस, सेशेल्स, मालदीव, मॉरिशस, श्रीलंका आणि इंडोनेशिया इ. बेटांचा समूह हिंदी महासागराची पूर्व सीमा निर्धारित करतात.

आशिया, आफ्रिका, आणि ऑस्ट्रेलिया या तीन खंडातील बेटापर्यंत हिंदी महासागार पसरला आहे. मलाका, जल डमरू मध्य आणि सुएझा कालवा या मधून प्रशांत महासागारापर्यंत पाणी पसरले आहे. आजही व्यापाराच्या दृष्टीने या सागराचे विशेष महत्त्व असून दर ११ मिनिटाला एक जहाज येथून जात असते. आजच्या परिस्थितीत अमेरिका या क्षेत्रातून ४० प्रकाराचा कच्चा माल प्राप्त करतो. जपान देखील येथूनच कच्चे तेल

मिळवतो. हिंदी महासागाराचे महत्त्व स्पष्ट करतांना अमेरिकेचे विशेषज्ञ आल्फ्रेड माहन यांनी म्हटले आहे कि, ''जे कोणते राष्ट्र हिंदी महासागरावर नियंत्रण मिळवेल, तेच राष्ट्र आशिया खंडावर वर्चस्व स्थापित करेल''. हा महासागार सात सागरांचे केंद्र आहे.

वर्तमान परिस्थितीत हिंदी महासागरात प्रवेश करण्याचे मार्ग ज्याला चेक पॉईट्स म्हटले जाते. त्यात मुख्यतः होरमुझची समुद्रधूनी सुएझ कालवा अथवा मल्लाकाची समुद्रधुनी आणि केप ऑफ गुड होप यांचा समावेश होतो. त्यावर नजर ठेवण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे सागरी क्षेत्रातील देश श्रीलंका, मॉरिशस, मालदीव, सेशेल्स, इ.ची सुरक्षा व्यवस्था, राजकीय स्थैर्य, आर्थिक विकास हा भारताच्या राष्ट्रीय हिताचा भाग आहे. कारण या राष्ट्रामध्ये स्थैर्य नसेल तर त्यांच्या कमकूवतपणाचा फायदा घेऊन या क्षेत्राबाहेरील राष्ट्रे हस्तक्षेप करून शकतात. महाशक्तीच्या या भागातील हालचाली, सैनिकी तळ, अण्वस्त्र नौका यामुळे तटवर्ती राज्य चिंताग्रस्त झाली आहे.

कैरो व लुसाका येथे झालेल्या आफ्रिका राष्ट्रांच्या अनुक्रमे १९६४ व १९७० च्या सभेत ह्या समुद्रातील परिस्थिती बाबत गंभीर चर्चा व्यक्त करण्यात आली आहे. या क्षेत्रास 'शांतता क्षेत्र' जाहीर करावे अशी मागणी या राष्ट्रांनी केली आहे. १६ डिसेंबर १९७१ रोजी महासभेने हिंदी महासागरास 'शांततेचे क्षेत्र' म्हणून घोषीत केले. त्याच बरोबर महाशक्तीची येथून आपले आरमार व सैनिकी तळ काढून घ्यावे असे घोषीत करण्यात आले. तटवर्ती राज्य आणि सुरक्षा मंडळाच्या कायम सभासद राज्यांनी ठरावाच्या अंमलबजावणीची योजना तयार करावी असेही ठरिवण्यात आलेञ परंतु या ठरावाबाबत दोन्हीं महासत्तांनी आणि पाश्चात्या राष्ट्रांनी विरोधी मतदान केले. १९७६ मध्ये मात्र सर्वांनी ठरवाला संमती दिली. हिंदी महासागर हा भाग शंततेचे क्षेत्र असावे अशा स्वरूपाचा ठराव अलिप्तवादी राष्ट आणि सार्क मध्ये अनेक वेळा मान्य झाला. यास भारताने वेळो-वेळी पाठींबा दिला आहे. हिंदी महासागराच्या तटीय राष्ट्रांनी दक्षता घेणे गरजेचे आहे. असे भारत नेहमी सांगता आला आहे. यासाठी इंडीयन ओशन रिम असोशिएशन सारखी संघटना देखील कार्यरत आहे.

हिंदी महासागरातील खनिज संपत्ती आणि दक्षिण अशिसाई राष्ट्रांवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी हे क्षेत्र आपल्या नियंत्रणाखाली असावे यासाठी ही राष्ट्रे नेहमी प्रयत्न करत आहेत. यावर उपाय म्हणून २००८ मध्ये भारतीय नौदलाने हिंदी महासागावर नाविक सिंपोझियम नियोजित केले होते. या प्रदेशातील तटीय राष्ट्रांना एकत्रित आणून हिंदी महासागरातील सुरक्षा व्यवस्थेबाबत विचारविनिमयासाठी हे चर्चासत्र आयोजित केले होते.

आजच्या स्थितीत वरील क्षेत्र आंतरराष्ट्रीय सत्ता स्पर्धेत क्षेत्र बनत चालेले असतांना त्या क्षेत्रातील देशांची संबंध वाढविण्याचे धोरण योग्यच आहे. त्या दृष्टिने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रेलिया, कॅनडा, मालदीव, मॉरिशस, सेशेल्स, अमेरिका आणि जापान इ. राष्ट्रांचा दौरा केला. दळव-वळण, व्यापार संरक्षण, आर्थिक विकास इत्यादी घटकांवर भर देऊन उभय पक्षी महत्त्वाचे करार करण्यात आले. त्या अगोदर भारत-अमेरिका-जापान यांच्यात अशा स्वरूपाचा सहकार्यात्मक करार झाला होता. या सहकार्याचा प्राथमिक रोख या क्षेत्रातील चीनचा वाढता प्रभाव हा होता. त्यात मुख्यतः पूर्व आणि दक्षिण चीन समुद्रा बाबतची चिंता होती. चीनला पाकिस्तानने हिंदी महासागरातील बंदरही आंदण म्हणून दिले आहे. त्यामुळेच साहजिकच भारताच्या चिंता वाढल्या आहेत.

हिंदी महासागरातील श्रीलंका आणि मालदीव हे भारताचे दोन शेजारी देश आहेत. या सागरातील भारताच्या समुद्री सीमा थायलंड आणि दुसऱ्या बाजूला इंडोनेशियाशीही जोडलेल्या आहेत. या भागात सागरी चाच्यांचा त्रास भारतीय व्यापारी जहाजांना होत आहे. म्हणून भारत शेजारी राष्ट्रांच्या विकास व सुरक्षिततेत स्वतःचे हित पाहतो.

हिंदी समहासागर देशाच्या रक्षणाशी व आर्थिक प्रगतीशी निगडीत आहे. तो भारताच्या ऐतिहासिक महात्म्याचा दर्शक आहे. त्यामुळे भारताने पारंपारिक भूखंड विषयक पराष्ट्रधोरणाला बाजूला ठेवून सागरी सामर्थ्य वाढवण्यावर भर दिला आहे. कारण हिंदी महासागरातील द्विपसमूहांतील देशांच्या भारताकडून सुरक्षेविषयीच्या अनेक अपेक्षा आहेत. भारताने त्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी हिंदी महासागर हे क्षेत्र दुसऱ्या महायुध्दांतर

आंतराष्ट्रीय राजकारणाचे महत्त्वाचे केंद्र बनले कारण की येथून जलमार्गाने व्यापार आणि काच्च्यामालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते.

हिंदी महासागरातील महाशक्तीच्या प्रवेशाची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. महासत्तांची साम्राज्यवादी महत्वकांक्षा

२. हिंदी महासागराचे राजकीय आणि आर्थिक महत्त्व

३. शीत युध्दाचा प्रभाव

४. नाविक दलाचे वाढते महत्त्व

५. उर्जेसाठी राखीव क्षेत्र

हिंदी महासागरात वरील कारणामुळे स्पर्धा सुरू झाली. यात अमेरिका आणि सोव्हियत रशिया आघाडीवर होते. या दोन महासत्तांनी आपापल्या प्रभाव क्षेत्राखाली विकसनशील आणि अविकसित राष्ट्रांना आणले. तटवर्तीय भागात आपले लष्करी नाविक तळ निर्माण केले. परिणामी निर्माण झालेली संघर्षमय स्थिती नियंत्रणात आणण्यासाठी किंवा त्या क्षेत्रातील तणाव कमी करण्यासाठी तटीय राष्ट्रांचे सार्वभौमत्व कायम राहण्यासाठी या राष्ट्रांनी १९८७ मध्ये इंडियन ओशन रिम असोसिएश्न फॉर रिजनल को-ऑपरेशन अंतर्गत हिदी महासागर तटीय क्षेत्रीय सहयोग संगठन नावाची संघटना स्थापन केली यात आशियन, आफ्रिकन, ऑस्ट्रेलियन खंडातील राष्ट्रे सहभागी आहेत.

हिंदी महासागराच्या तटीय क्षेत्रात पुढील ४७ राष्ट्रांच्या समावेश होतो. साऊथ आफ्रिका, सोमालिया, डिजिबुटी, इरीटेरिया, कोमोरोस, टांझानिया, सियाचिल्स, केनिया, सोमानिया, सुदान, इजिप्त इस्त्राईल, जॉर्डन, सौदी अरेबिया, येमेन, ओमान, युनायटेड अरब अमिरात, कतार, बहारिन, कुवैत इराक, इराण, पाकिस्तान, भारत, मालदीव, श्रीलंका, बांग्लादेश, बर्मा, थायलंड, मलेशिया, सिंगणापूर, इंडोनेशिया, कोकोस (आइसलँड), ऑस्ट्रेलिया, तिमोरलेस्टे, अस्मोर, आणि करिटीअर, हार्ड आइस आणि एम.सी. डोनाल्ड आइसलँड, ऑस्ट्रेलिया, फ्रेंच साऊथर्ण आणि अंटर्क्टिका लँड झांझिबार, एम्स-७ या

संघटनेतील राष्ट्रे मॉरिशस, केनिया दक्षिण आफ्रिका, ओमान, भारत, सिंगापूर, आणि ऑस्टेलिया आहेत. 'हिमतक्षेत्र' सारखीच या संघटनेची देखील तत्त्व आहेत.

१. हिंदी महासागार क्षेत्रातील तटीया राष्ट्रांचा विकास व जीवनमान उंचावणे.

२. समतोल विकास करणे.

३. आर्थिक सहकार्य वाढविणे, व्यापार, पर्यटन यास चालना देणे.

४. आंतरराष्ट्रीय आर्थिक मुद्यावर विचारविनियम.

५. बौध्दिक संपदा विकास व प्रशिक्षण संस्था विद्यालये, विद्यापीठांची स्थापना.

संशोधन विषयाचे महत्त्व व निवड :

२१ व्या शतकातील आशिया खंडाचे व्यापार, राजकारण, औद्योगिकरण, आयात-निर्यात इ. क्षेत्रातील महत्त्व ओळखून महासत्ताची स्पर्धा येथे वाढली आहे. विशेषतः दक्षिण आशियातील विकसनशील व अविकसित राष्ट्रांवर लक्ष केंद्रीत करून तेथील राजकारण व अर्थव्यवस्था इत्यादींवर नियंत्रण मिळवण्याच्या दृष्टिने स्पर्धेत वातावरण निर्माण झाले आहे.

पॅसिफिक आणि अंटलांटिक महासागरा नंतर हिंदी महासागराचा क्रम लागतो. आफ्रिका, आशिया, आणि ऑस्ट्रेलिया या तीन खंडानी वेडलेला हा समुद्र आहे. ह्या महासागरा भोवती तटवर्ती ३६ राष्ट्रे आणि प्राप्त करणारे ह्या तीन खंडातील इतर ११ राज्य आहेत. ह्या राज्यांपैकी बहुंताश राज्ये अलिप्त आहेत. ह्या महासागरास राजकिय, आर्थिक आणि सैनिक डावपेचाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या समुद्राचे तळ खनिज द्रव्यांनी अत्यंत समुध्द आहे. जेवढे सोने उपलब्ध होते. त्यापैकी ८०.०७ टक्के सोने, कथिल ५६.०६ टक्के मॅगनिज ७३.०३ टक्के या समुद्र तळात काढले जाते. तेलाचे प्रचंड साठेही या समुद्राच्या गर्भात आहेत. म्हणूनच बड्या राज्यांचे लक्ष केंद्रित झाले आहेत व त्या शक्ती खनिज द्रव्य संपत्तीचा लाभ घेत आहेत.

सागरी मार्गाने होणाऱ्या व्यापराला चालना देऊन आरमारी सामर्थ्ये वाढवण्यावर या महासत्ता लक्ष केंद्रीत करत आहेत आणि अविकसनशील राष्ट्रांवर अर्थकरण व राजकारणाच्या दृष्टीकोनातून नियंत्रण मिळवत आहेत. विशेष करून हिंदी महासागरातील

तटीय प्रदेशातील देश याला बळी पडले आहेत. हि सर्व तटीय राष्ट्रे भारताशी शेजारी राष्ट्रे असल्या कारणाने त्यांच्या अखंडत्व व सार्वभौमत्व रक्षणाची संपूर्ण जबाबदारी भारतावर आहे. शेजारी राष्ट्रांच्या सुरक्षिततेत आपली सुरक्षा सामावलेली आहे. या उद्देशाने भारत हिंदी महासागरातील आपली भूमिका साकारतो आहे.

हिंदी महासागरातील होत असलेल्या सत्त स्पर्धेतून राजकिय हिंसाचार, गटबाजी आणि दशहतीचे राजकारण थांबवण्याची जागतिक शांतता निर्माण व्हावी यासाठी भारत आपली सर्व समावेशक अशी भूमिका ठेवतो आहे. आंतरराष्ट्रीय शांततेच्या दृष्टीने प्रस्तूत विषय महत्त्वाचा आहे. येणाऱ्या कालखंडातील हिंदी महासागरातील वैश्विकतेच्या दृष्टिकोनातून कसे महत्त्व आहे. या गोष्टीचा प्रस्तूत विषयात अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाचे उद्देश :

१. आंतरराष्ट्रीय राजकरणात हिंदी महासागरातील स्थान निश्चित करणे.

२. हिंदी महासागतील प्रमुख सत्ता स्पर्धांचा अभ्यास करणे.

३. दक्षिण आशिया खंडाचे महत्त्व स्पष्ट करणे.

४. हिंदी महासागरातील भारताचे भूमिका स्पष्ट करणे

५. हिंदी महासागरातील सागरी व्यापारचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :

१. हिंदी महासागर हे क्षेत्र आंतरराष्ट्रीय व्यापाराचे एक महत्त्वाचे केंद्रे आहे.

२. हिंदी महासागरात विपूल प्रमाणात खजिन संपत्ती असल्याने सत्ता स्पर्धा वाढवलेली आहे.

३. हिंदी महासागरातील सत्ता स्पर्धेचा आशियन राष्ट्रावर परिणाम पडला आहे.

४. दक्षिण आशियात भारताचे महत्त्वपूर्ण स्थान

५. चीन, अमेरिका, रशिया, जर्मनी इ. सत्तांच्या स्पर्धेमुळे भारतीय राजकारण आणि परराष्ट्र धोरणावर गंभीर प्रभाव पडत आहे.

६. क्षेत्रीय संघटना आणि तटीय राष्ट्रे असून देखील हिंदी महासागर क्षेत्रात शांतता प्रस्थापित झालेली नाही.

संशोधन पध्दती :

प्रस्तूत विषयाच्या अभ्यासाकरिता संख्यात्मक व गुणात्मक तसेच प्राथमिक व दुय्यम विश्लेषणात्मक साधनाचा उपयोग करण्यात येईल. तसेच अनुभवात्मक तंत्राचा उपयोग करण्यात येईल. विषयासंबंधित संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख इ. साधनांचा उपयोग करण्यात येईल. ज्यामुळे संशोधनाची विश्वसनीयता वाढवण्यात मदत होईल.

संशोधनाची रूपरेषा :

१. प्रस्तावना.

२. हिंदी महासागर क्षेत्रातील सत्ता स्पर्धेची पार्श्वभूमी.

३. वर्तमान हिंदी महासागरातील सत्ता स्पर्धेचा तुलनात्मक अभ्यास.

४. हिंदी महासागरातील शांतता प्रस्थापण्याची भारताची भूमिका.

५. सारांश व निष्कर्ष.

संदर्भ सूची :

१. सिंह एस.सी. : अंतर्राष्ट्रीय समकालीन विवान.

२. फाडिया बी.एल. : अंतर्राष्ट्रीय राजनीति, प्रतियोगिता दर्पण प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण, १३ डिसेंबर २०१३.

३. सहस्त्रबुध्दे उत्तरा व पेंडसे अरुणाः आंतरराष्ट्रीय संबंध आणि शीत युध्दोत्तर जागतिक मुद्दे, आर्यन्ट ब्लॅकमेन पब्लिकेशन, मुंबई - २००८.

४. गुप्ता सतीश, भारत की अंतर्राष्ट्रीय विदेश नीती, इशिका पब्लिशिंग हाऊस, जयपूर, भारत, प्रथम संस्करण, २०१०.

५. कुमार हर्ष, हिंदी महासागार चुनौतियाँक एवं विकल्प, सिंन्हा प्रकाशक.

६. कासिम एस.झेड.: जानिए हिंद महासागर को, प्रभात प्रकाशन, २०१०.

७. रायपूरकर वसंत : आंतरराष्ट्रीय संबंध, मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २००६.

८. Dixit J. N. India's Foreign Policy, Prabhat Prakashan, New Delhi.

९. Patnaik Sudhir, India's Foreign Policy (Basic Issues and Political Attitudes), Arise Publishers, New Delhi, First Edition, 2008.

१०. Jautekar K.S.: DIEGO GARCIA in International Diplomacy, Bombay Popular Prakashan, 1983.

संशोधक
नामदेव विठ्ठलराव खंदारे

मार्गदर्शक
डॉ.आर.आर.बैनवाड
सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग,
नुतन महाविद्यालय, सेलू